करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
www.saptahiksandesh.com
संस्थापक संपादक
डॉ.अॅड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.४१ | पाने-१२ | दि.२५/०७/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.







# अखेर डिकसळ पुल वाहतुकीसाठी बंद - ३० गावांचा पुणे जिल्ह्याशी संपर्क तुटला

करमाळा : उजनी जलाशयावरील भीमा नदीवर असलेला डिकसळ येथील ऐतिहासिक पुल अखेर प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये म्हणून पूर्णत: बंद करण्यात आला आहे. या पुलाच्या करमाळा तालुक्यातील बाजूस उत्तर दिशेला मोठ्या प्रमाणावर पाण्याने बोगदा पडल्याचे निदर्शनास आले, त्यामुळे हा पुल केव्हा कोसळेल आणि वाहून जाईल हे सांगता येणे अशक्य आहे; अशी माहिती तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी दिली.

ब्रिटिशकाळात सन १८५५ मध्ये रेल्वे मार्गासाठी बांधण्यात आलेला हा पुल सुमारे अर्धा किलोमीटर लांबीचा होता. या मार्गावरून १९७० पर्यंत रेल्वे धावायची. मात्र उजनी प्रकल्पाच्या कामानंतर हा रेल्वे मार्ग बदलण्यात आला. तो खानोटा-भिगवण असा सुरू आहे. सध्या मात्र हा पुल जीर्णावस्थेत पोहोचला आहे. ब्रिटिश कंपनीने सन २००० साली पत्र लिहून या पुलाचे आयुष्य संपल्याचे कळवले आहे. त्यानंतरही या पुलावरून वाहतूक सुरू होती. सन २०२१ पासून मोठ्या वाहनांची वाहतूक बंद केली होती. सध्या या भागातून दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याने जीवितास धोका निर्माण होतोय. त्यामुळे (पान २ वर)

## छोट्या वाहनासाठी हा पुल लवकर सुरू होणार



या पुलाचे काम अतिशय संथ गतीने चालले आहे. मी नुकत्याच अधिवेशनात हा विषय उपस्थित केला आहे. सदर पुलाचे काम तातडीने पूर्ण व्हावे यासाठी मी प्रयत्नशील आहे. दुचाकी, मोटारसायकल हलक्या वाहनांसाठी मार्ग खुले करण्यासाठी तातडीने निर्णय घेतला जाईल.

...नारायण पाटील (आमदार, करमाळा)

## जीवित हानी होऊ नये म्हणून



डिकसळ पुल अत्यंत धोकादायक स्थितीत असून, नागरीकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये म्हणून वाहतूक पुर्णत: बंद करण्यात आली आहे. नागरीकांना त्रास होणार आहे, पण कोणतीही जीवित हानी होऊ नये म्हणून आम्ही हा निर्णय घेतला आहे. ही माहिती वरीष्ठांना कळविण्यात आलेली आहे. हा पुल लवकर होण्यासाठी वरीष्ठ पातळीवर विनंती करणार आहे. इंदापूर तहसीलदार त्या बाजूचा रस्ता बंद करणार आहेत.

...शिल्पा ठोकडे (तहसीलदार, करमाळा)






# करमाळ्यात बंदी असलेला नायलॉन मांजा जप्त

करमाळा(सं.प्र.) : करमाळा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुप्त माहितीच्या आधारे तात्काळ कारवाई करत महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला नायलॉन मांजा साठवणूक व विक्री प्रकरणी सादीक युसूफभाई तांबोळी (रा.कानाड गल्ली, करमाळा) या दुकानदारावर कारवाईक करत ५,६०० रूपये किंमतीचा नायलॉन मांजा जप्त केला आहे. २० जुलै रोजी सायंकाळी पाच ते सहा दरम्यान पोलीस कॉन्स्टेबल मिलींद दहिहांडे हे पेट्रोलिंग करत असताना त्यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, तांबोळी किराणा व जनरल स्टोअर्स या दुकानात नायलॉन मांजा साठवला जात असून विक्री केली जात आहे. या माहितीच्या आधारे पोलीसांनी दोन पंचांना सोबत घेऊन कारवाई केली. दुकानाची झडती घेतली असता, मोनो आरटीसी कंपनीचे एकूण १६ नायलॉन मांजाचे रोल प्रत्येकी ३५० रूपये प्रमाणे मिळून आले. सदर मुद्देमालाची किंमत सुमारे ५६०० रू. इतकी असून हा मांजा जप्त केला आहे.

नायलॉन मांजा वापरामुळे पक्षी, गुरे व माणसांचे प्राण धोक्यात येतात म्हणून राज्य शासनाने त्यावर पूर्णत: बंदी घातली आहे. असे असतानाही सादीक तांबोळी याने विक्री व साठवणूक करून सार्वजनिक उपद्रव निर्माण केला. त्यामुळे त्याच्याविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम २२३ व पर्यावरण संरक्षण अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# केम येथे मस्जिद परिसरातील वादातून दोन गटात हाणामारी

करमाळा(सं.प्र.) : केम गावातील मस्जिद परिसरात सफाईच्या कामावरून झालेल्या वादाचे रूपांतर गंभीर हाणामारीत झाले. यामध्ये दोन्ही गटांचे एकूण १३ जण सामील असून दोन्ही बाजूंनी एकमेकांविरूध्द करमाळा पोलीसात फिर्याद दाखल केली आहे. यात पहिली फिर्याद सुलतान रमजान मुलाणी (रा.केम) यांनी दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मस्जिदच्या आवारात मी सफाई करत असताना इन्नुस बाबा पठाण वहिवर काहीतरी लिहित असल्याचे निदर्शनास आले. त्यास विचारणा केली असता तो रागात गेला व काही वेळात इन्नुस पठाण व त्याचे नातेवाईक दिलावर पठाण, नजीर पठाण, अस्लम पठाण, सरदार पठाण व मुसा पठाण हे लोखंडी रॉड व पाईपसह आले. त्यांनी मला मारहाण करण्यास सुरूवात केली तसेच शिवीगाळ करून धमकी दिली दुसरी फिर्याद दिलावर करीम पठाण(रा.केम ) यांनी दिली. त्यात त्यांनी म्हटले की, त्याचे चुलत भाऊ इन्नुस पठाण लघुशंकेसाठी मस्जिद परिसरात गेले असता, सुलतान मुलाणी व इन्नुस पठाण यांनी त्यास धमकावले. नंतर काही वेळात सुलतान मुलाणी, इन्नुस पठाण, पाप्या, आशपाक, शहाबाज आणि अनिस (सर्व मुलाणी) यांनी लोखंडी रॉड व काठ्यांनी मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. दोन्ही गटातील १३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोर्टी येथे किरकोळ वादातून झालेल्या मारहाणीत एकाचा मृत्यू

करमाळा(सं.प्र.) : कोर्टी येथील खंडोबा झोपडपट्टीत नळाच्या पाण्यावरून झालेल्या किरकोळ वादातून गंभीर मारहाण होऊन एका मजुराचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. हा प्रकार १७ जुलैला झाला आहे. या प्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी शितल गणेश भोसले (रा.खंडोबा झोपडपट्टी, कोर्टी) यांनी पोलीसात फिर्याद दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १७ जुलै रोजी सकाळी नऊ वाजता मी दूध आणण्यासाठी घरातून निघले असताना शेजारील सुनिता उर्फ छकुली रतन केंदळे हिन तुझ्या घरचे नळाचे पाणी आमच्या घरासमोर कसे काय आले.. या कारणावरून शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर तिची आई कमल प्रभाकर जगदाणे हिनेही मला हाताने मारहाण केली. वाद वाढत असताना माझी आई रेणुका, पती गणेश भोसले व नणंद राणी पवार हे भांडण सोडवायला आले. त्यावेळी छकुली हिचा मुलगा गणेश रतन केंदळे याने घरातून लोखंडी पाईप आणून तू माझ्या आईला मारायला आला काय.. असे म्हणत गणेश भोसले याच्या डोक्यात जोरदार मारले. या आघाताने गणेश जागीच बेशुध्द पडले आणि त्यांच्या डोक्यातून रक्त वाहू लागले. काही वेळातच रतन केंदळे (छकुलीचा पती) हा देखील बाहेर येऊन शिवीगाळ करू लागला. नातेवाईकांनी व गावकऱ्यांनी मध्यस्थी करत गणेश यांना तातडीने करमाळा उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले.

मात्र तेथे प्राथमिक उपचारानंतर अधिक गंभीर स्थितीमुळे त्यांना सोलापूर सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. १८ जुलै रोजी सायंकाळी सहा वाजता उपचार सुरू असताना गणेश भोसले यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व वृध्द आई-वडील असा परिवार आहे. या घटनेने संपूर्ण कोर्टी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

ONSPOT ENERGY
एनर्जी ऑन द स्पॉट..!
9 तास एलईडी बल्ब
2 वेळा लॅपटॉप चार्ज
12 तास कॅमेरा चार्ज
12 तास राऊटर चार्ज
5 वेळा मोबाईल चार्ज
Micro
1 वर्ष वॉरंटी
वजन 700 ग्रॅम | शॉर्ट सर्किट प्रोटेक्शन | चार्जिंग वेळ 4 तास
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
सोलर | इन्व्हर्टर | बॅटरी 9172927337
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा

# घराच्या गेट मधून मोटारसायकलची चोरी

करमाळा(सं.प्र.) : शहरातील शिवाजीनगर परिसरात घराच्या गेटमधून हँडल लॉक तोडून अज्ञात चोरट्याने मोटारसायकल चोरून नेल्याची घटना १३ जुलै रोजी दुपारी घडली. या प्रकरणी भाऊ महादेव भिलारे (रा.शिवाजीनगर) यांनी करमाळा पोलीसात फिर्याद दाखल केली आहे. भिलारे यांचे करमाळा शहरात इलेक्ट्रॉनिक्सचे दुकान आहे. नेहमीप्रमाणे दुपारी अडीच वाजता जेवणासाठी त्यांनी दुकान बंद करून आपली होंडा कंपनीची सीबी शाईन मोटारसायकल (क्र.एमएच २५ एबी ७७१९) घराच्या गेटमध्ये हँडल लॉक करून ठेवली होती. जेवणानंतर साडेतीन वाजता दुकानात जाण्यासाठी बाहेर आले असता त्यांना मोटार-सायकल दिसली नाही. घरातील सदस्यांकडे विचारणा केली असता कोणी काही सांगू शकले नाही. त्यानंतर त्यांनी परिसरात व शहरात सर्वत्र शोध घेतला, मात्र गाडी मिळून आली नाही. या घटनेनंतर भिलारे यांनी पोलीसात फिर्याद दिली आहे. यात अज्ञात चोरट्यांविरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# साडे येथे मटक्यावर छापा

करमाळा(सं.प्र.) : साडे गावातील बसस्टॅन्ड जवळ मटका जुगार चालवत असलेल्या इसमावर पोलीसांनी छापा टाकून त्यास रंगेहाथ पकडले असून त्याच्याकडून मटका जुगाराचे साहित्य व १७५० रू. रोकड जप्त केली आहे. ही कारवाई १९ जुलै रोजी दुपारी पावणेएक च्या सुमारास करण्यात आली. या प्रकरणी पोलीस नाईक हनुमंत भराटे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले आहे, की साडे गावातील बसस्टॅन्ड जवळ चिकन सेंटरच्या बाजूला दिलीप बाबुराव शेलार (रा.साडे) हा मटका जुगार चालवत होता. त्याच्यावर जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वरकुटे येथे जमीनबांधाच्या वादातून तिघांकडून एकास बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.) : वरकुटे शिवारात जमिनीच्या बांधावरून झालेल्या वादातून चुलत भावाने कुटूंबियांसह मिळून एकास मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी तिघांविरूध्द करमाळा पोलीसात गुन्ह दाखल झाला आहे. या प्रकरणी गणेश अंकुश चव्हाण (वय-३०, रा.वरकुटे) यांनी पोलीसात फिर्याद दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २० जुलै रोजी सकाळी अकरा वाजता मी माझ्या शेतात काम करत असताना शेजारील शेतात चुलत भाऊ महादेव नारायण चव्हाण झेंडूच्या फुलांची लागवड करत होता. यावेळी मी त्यास माझ्या शेताचा बांध का कोरला ?अशी विचारणा केली असता महादेव याने रागाच्या भरात शिवीगाळ करत हा बांध माझाच आहे, तुला काय करायचं ते कर.. असे सांगून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर महादेव याने आपली पत्नी इंदुबाई व मुलगा परशुराम यांना बोलावून घेतले. त्या तिघांनी मिळून मला जबर मारहाण केली. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# सेवानिवृत्त कर्मचारी संघाची २७ जुलैला वार्षिक सभा

करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथील सेवानिवृत्त कर्मचारी संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा २७ जुलैला दुपारी एक वाजता श्री स्वामी समर्थ मंदिर, फंडगल्ली येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेला वेळेवर उपस्थित रहावे; असे आवाहन संघाचे अध्यक्ष भागवत घाडगे व सचिव नारायण घोलप यांनी केले आहे.

मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

आता करमाळा शहरात
कान, नाक, घसा तज्ञ
डॉ.हर्षदा मगर (ENT Specialist) MBBS, MS, ENT
दर शुक्रवारी (दुपारी २ ते ७) शिंदे हॉस्पिटल, करमाळा येथे उपलब्ध !
उपलब्ध सुविधा व उपचार : कानाचा पडदा फाटणे, आवाजात बदलाव येणे, ॲलर्जी, श्वास नलिकेची समस्या, सायनसचे आजार, बहिरेपणा, झोपेत घोरणे, टॉन्सिलचे आजार, थायरॉईडची समस्या, लासुर्णेची समस्या, दुर्बिणद्वारे नाक व घसा तपासणी, चक्कर येणे, घशाचे व तोंडाचे कॅन्सर
शिंदे हॉस्पिटल शाहूनगर, बायपास रोड, करमाळा.
मो.7709669535, 8484029479

# कधी न सोडलेल्या.., 'सेवेचा प्रवास'

"जिथं हृदयात प्रेम अन् डोळ्यात करूणा..,
तिथं उगम होते खऱ्या माणुसकीची प्रेरणा..!"

करमाळा नगरपरिषदेतील एक तेजस्वी, समर्पित आणि मनापासून कार्य करणाऱ्या व्यक्तीमत्वाचं नाव म्हणजे आदरणीय स्वातीताई रामकृष्ण माने. त्यांच्या जीवनात यंदा एक अद्भूत योगायोग आला आहे. दि.२१ जुलै रोजी त्यांचा वाढदिवस आणि अवघ्या दहा दिवसात ३१ जुलै २०२५ रोजी त्यांची सेवानिवृत्ती. आयुष्यभर समाजासाठी झिजलेल्या या मातृव्रत व्यक्तीमत्वाच्या जीवन प्रवासाचा हा एक सुवर्णक्षण आहे. ज्यात त्यांची झेप, त्याग आणि सेवा याचं कौतूक करणं, हा आपल्यासाठी सन्मान आहे.

स्वातीताईंचा जन्म औरंगाबाद (संभाजीनगर) येथील चळवळीतल्या कुटूंबात झाला. त्यांचे वडील आसाराम गुरूजी हे भटक्या विमुक्त समाजातील एक धडपडणारे, सामान्य माणसांसाठी लढणारे दीपस्तंभ होते. त्यांच्या आई वेणुबाई यांनी प्रेमळ, शिस्तबध्द आणि माणुसकीची बीजे स्वातीताईंच्या मनात रोवली. संभाजीनगर मध्ये प्राथमिक, माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर वसंतराव नाईक महाविद्यालय मधून त्यांनी पदवी घेतली. पुढे २ जून १९९१ रोजी त्यांचा विवाह करमाळ्याचे सामाजिक कार्यकर्ते आणि भटक्या विमुक्त जाती जमाती आदिवासी ज्ञानपीठ संस्थेचे संस्थापक व माजी नगरसेवक रामकृष्ण माने यांच्याशी झाला. त्या नंतर त्यांनी करमाळा ही आपली कर्मभूमी मानली.



सुरूवातीला महात्मा फुले समाजसेवा मंडळात त्यांनी बालवाड्यातील मुले शिकवणं, महिलांच्या गटात काम करणं, मेळावे आयोजित करणं, मार्गदर्शन करणं अशी कामं स्वीकारली. घरी शिलाईकाम, किराणा दुकान चालवलं. त्या काळात माने भाऊ आदिनाथ कारखान्यावर सुरक्षा अधिकारी म्हणून नोकरी करत होते. पण त्यांनी ती नोकरी सोडून संपूर्णपणे सामाजिक कार्यात स्वत:ला झोकून दिलं आणि त्यांना स्वातीताईचं बळ लाभलं.

स्वातीताईंना एम्प्लॉयमेंट एक्सेंज मधून नोकरीची संधी मिळाली. तत्कालीन नगराध्यक्ष गिरधरभई देवीच्या कालावधीत डिसेंबर १९९३ मध्ये त्या करमाळा नगरपालिकेत क्लार्क म्हणून रूजू झाल्या. त्या दिवसापासून त्यांनी मागे वळून पाहिलं नाही. सार्वजनिक योजनांमध्ये, विशेषत: संजय गांधी निराधार योजना, महिला सक्षमीकरण, नागरीकांच्या अडचणी, गरजूंसाठी सेवा या सर्व बाबींमध्ये त्यांनी प्रामाणिक आणि पारदर्शक कार्य केलं. 'लाच घेणार नाही, खाऊ देणार नाही' हे त्यांचं जीवनमूल्य ठाम होतं. त्या मूल्यांमुळे त्यांना त्रासही झाला. पण त्यांनी कधीही आपल्या तत्वांना तडा जाऊ दिला नाही.

सन १९९९ मध्ये त्यांनी आणि रामकृष्ण भाऊंनी मिळून 'भटक्या विमुक्त जाती-जमाती आदिवासी ज्ञानपीठ' या संस्थेची स्थापना केली आणि त्यातून 'एकलव्य आश्रमशाळा' सुरू झाली. ही संस्था आज शेकडो विद्यार्थ्यांसाठी शिक्षण, संस्कार आणि सुरक्षित आश्रय बनली आहे. त्या या संस्थेच्या उपाध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत. शाळेतील प्रत्येक लेकराला त्यांनी आईसारखं प्रेम दिलं आहे.

एकीकडे नगरपालिकेत नोकरी, दुसरीकडे संस्थेचं व्यवस्थापन, त्यासोबत 'क्षितीज' या महिलांच्या संस्थेमध्ये काम आणि घरची जबाबदारी. ही सर्व बाजू त्यांनी समतोल साधत पार पाडली. तसेच स्वातीताई या महाराष्ट्र राज्य कैकाडी समाज महिला संघटनेच्या राज्य अध्यक्षा या पदावर ही काम करत आहेत. या साऱ्या धावपळीच्या काळात त्यांनी आपली कन्या क्रांती हिला बी.एस्सी ॲग्रीकल्चर नंतर एम.एस्सी इकॉनॉमिक्स पर्यंत शिकवलं. मुलगा संग्राम याला ॲडव्होकेट म्हणून घडवलं. आपल्या मुलांवर उत्तम संस्कार करत त्यांना समाजासाठी उपयुक्त बनवलं.

त्यांच्या सेवाकाळात त्यांना पदोन्नती किंवा केडरमध्ये जाण्याची संधी होती. पण त्यांनी ती संधी नाकारली कारण बदली होऊ नये, संस्था आणि करमाळा सोडावं लागू नये म्हणून त्यांनी क्लार्क पदावरच समाधान मानलं. ही त्यांची केवळ नम्रता नव्हे तर समाजाशी असलेली निष्ठा होती. आज त्या ३२ वर्षांची सेवा पूर्ण करून ३१ जुलै २०२५ ला सेवानिवृत्त होत आहेत. विशेष म्हणजे त्यांचा वाढदिवस अगदी त्या आधी २१ जुलै रोजी झाला आहे. या दोन तारखा त्यांच्या आयुष्यातील दोन तेजस्वी वळणं आहेत. एक नव्या अध्यायाची सुरूवात आणि दुसऱ्या अध्यायाचा यशस्वी समारोप. त्यांच्या कार्याचे स्मरण हे करमाळा नगरपालिकेसाठी आणि येथील जनतेसाठी सदैव प्रेरणादायक ठरणार आहे.

स्वातीताई म्हणजे करमाळा नगरपालिकेतील केवळ एक कर्मचारी नव्हे तर महिला सक्षमीकरणाची एक मूर्तीमंत प्रेरणा आहेत. त्यांनी केवळ नोकरी केली नाहीतर समाजाच्या हृदयात आपली जागा निर्माण केली. तुमचं आयुष्य म्हणजे चालतं श्रध्दास्थान आणि कार्य म्हणजे एक अढळ दीपज्योत..!

"पद नसलंतरी प्रभाव होता,
संघर्ष असलातरी समर्पण प्रखर होतं
म्हणूनच तुम्ही 'ताई' नव्हे तर
करमाळ्याच्या अंत:करणात
'माई' आहात..!"

करमाळ्याच्या तमाम जनतेकडून प्रेमाने आणि अभिमानाने सेवापूर्तीच्या हार्दिक शुभेच्छा!

...डॉ.ॲड.बाबूराव हिरडे (९४२३३३७४८०)

# 'कठोर परिश्रम' एक शस्त्र.. वेधक
## प्रतापच्या वाटचालीतून सिध्द !

तुम्हाला त्या मुलाबद्दल माहिती आहे का ज्याची मोदीजींनी प्रशंसा केली व त्याला डीआरडी मध्ये नोकरी मिळाली ? त्या मुलाचे नाव प्रताप (वय-२१) तो कर्नाटकातील म्हैसूर जवळील कडाईकुडी नावाच्या गावातील आहे. प्रताप हा एका गरीब कुटूंबातील असून त्याचे वडील एक साधे शेतकरी आहेत. तो लहानपणापासूनच वर्गात नेहमीच पहिला येत असे. परंतु आर्थिक अडचणींमुळे त्याचे शिक्षण पूर्ण करू शकले नाही.

सुट्टीच्या काळात त्याला जे काही १००-१५० रूपये मिळत असत ते तो जवळच्या इंटरनेट सेंटरमध्ये जाऊन इस्त्रो, नासा, बोईंग रोल्स रॉयस, हॉविटझर इ. वर संशोधन करायचा व तिथल्या शास्त्रज्ञांना ई-मेल पाठवायचा. परंतु त्याला कधीही उत्तर मिळाले नाही, पण तो निराश झाला नाही. त्याला इलेक्ट्रॉनिक्स खूप आवडायचे. त्याचे स्वप्नं इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी करण्याचे होते. पण गरीबीमुळे त्याला बी.एस्सी (फिजिक्स) मध्ये प्रवेश घ्यावा लागला. वसतिगृहाची फी भरू न शकल्यामुळे त्याला काढून टाकण्यात आले. तो बस मध्ये राहत असे, सार्वजनिक शौचालयात काम करत असे व मित्राच्या मदतीने सी++, जावा, पायथॉन सारख्या भाषा शिकत असे. त्याने मित्रांकडून व कार्यालयामधून ई-कचऱ्यात सापडणारे की बोर्ड, माऊस, मदरबोर्ड इ. गोळा केले व त्यावर प्रयोग केले त्याने म्हैसूर मधील इलेक्ट्रॉनिक कंपन्यांमधून कचरा गोळा केला व ड्रोन बनविण्यास सुरुवात केली. तो दिवसा काम करत व अभ्यास करत व रात्री प्रयोग करत असे. सुमारे ८० वेळा अपयशी ठरल्यानंतर त्याने बनवलेला ड्रोन अखेर उडला. आणि तो एक तास रडला, पण यावेळी ते आनंदाचे अश्रु होते. जेव्हा त्याच्या मित्रांना हे कळले तेव्हा तो हिरो बनला. त्याच्याकडे अजूनही अनेक ड्रोन मॉडेल्सची योजना आहे. दरम्यान त्याला दिल्लीत ड्रोन स्पर्धेची बातमी मिळाली.दोन हजार रूपये कमवल्यानंतर तो जनरल डब्यात बसून दिल्लीला पोहोचला. तेथे त्याने दुसरे स्थान पटकावले व जपान मधील जागतिक ड्रोन स्पर्धेस भाग घेण्याची संधी मिळाली. यावेळीही तो आनंदाने एक तास रडला.

जपानला जाण्यासाठी लाखो रूपये खर्च आला व तिथे शिफारस आवश्यक होती. एका मित्राने त्याला चेन्नईतील एका अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांकडून शिफारस मिळवून दिली. म्हैसूरच्या एका देणगीदाराने त्याला विमानाचे तिकीट दिले. त्याच्या आईने त्याला तिचे मंगळसूत्र व उर्वरित खर्चासाठी ६० हजार रूपये दिले. तो बंगळुरू विमानतळावरून टोकियोला पोहोचला. बुलेट ट्रेन महाग होती म्हणून त्याने १६ स्थानकांवर ट्रेन बदलल्या व शेवटी स्पर्धेच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी आठ किमी चालत गेला. सर्व हाय-फाय सहभागी तिथे आले होते बेंझ व रोल्स-रॉइस कारमध्ये. पण प्रतापला झाड किंवा पक्षी दिसले नाही, फक्त लक्ष्य.

त याने त्याचे ड्रोन मॉडेल दाखवले. १२७ देशतील सहभागीं मध्ये त्याचे नाव होते. निकाल जाहीर होत होते, तिसरे पारितोषिक



फ्रांस, दुसरे पारितोषिक अमेरिका. प्रताप निराश होऊन परतत होता. घोषणा झाली तेव्हा पहिले पारितोषिक भारताचे श्री.प्रताप ! तो आपले सामान तिथेच सोडून रडू लागला व स्टेजकडे धावला. त्याने त्याचे पालक, गुरू, मित्र व देणगीदार यांची नावे घेतली. अमेरिकेचा ध्वज खाली पडला व वर भारतीय ध्वज फडकत होता. थरथरत्या हातपायांसह, घामाने भिजलेल्या कपड्यांसह प्रताप स्टेजवर पोहोचला. त्याने पहिले बक्षीस व $10,000 (सुमारे ७ लाख रू.) जिंकले. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या फ्रेंच संघाने त्याला १६ लाख रूपये मासिक पगार, पॅरिसमध्ये एक प्लॉट व अडीच कोटी किंमतीची कार देऊ केली. त्यावेळी प्रताप म्हणाला.., "मी हे सर्व पैशासाठी केले नाही. माझे ध्येय माँ भारतीची सेवा करणे आहे!"

त्यानंतर स्थानिक आमदार व खासदार यांनी त्याची पंतप्रधान नरेंद्र मोदींची ओळख करून दिली. मोदीजींनी त्याचे अभिनंदन केले व त्याला डीआरडीओ कडे पाठवले. आता तो डीआरडीओच्या ड्रोन विभागात एक शास्त्रज्ञ आहे. तो दरमहा २८ दिवस परदेशात प्रवास करतो व डीआरडीओसाठी ड्रोन ऑर्डर घेऊन येतो. "जर कठोर परिश्रम हे शस्त्र असेलतर यश गुलाम बनते " प्रताप आज या म्हणीचा जिवंत पुरावा आहे.

# स्वयंम पानसांडे जिल्हा गुणवत्ता यादीत



करमाळा(सं.प्र.): येथील नामसाधना प्राथमिक विद्या मंदिर सेंट्रल स्कूल मुले नं.१ या शाळेतील पहिलीचा विद्यार्थी स्वयंम पानसांडे याने विविध प्रज्ञाशोध परीक्षेत यश संपादन केले आहे. स्वयंम याने एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्ह्यात तिसरा, मंथन परीक्षेत जिल्ह्यात पाचवा, आयएम विनर परीक्षेत तालुक्यात दुसरा, एमआरटीएस परीक्षेत तालुक्यात पहिला, बुध्दीवंत परीक्षेत केंद्रात चौथा, अभिरूप परीक्षेत केंद्रात चौथा असे यश प्राप्त केले आहे. तसेच स्वयंमने पहिलीत सहा प्रज्ञाशोध परीक्षेत सहभाग घेतला. त्यापैकी पाच परीक्षांमध्ये त्याला बक्षीस ट्रॉफी मिळाली आहे. स्वयंम यास भैलुमे मॅडम, जगताप मॅडम, अर्चना पानसांडे मुख्याध्यापिका सुनंदा माने यांचे मार्गदर्शन लाभले.

विकणे आहे

करमाळा शहरातील सदाशिव पार्क मधील १३००, २३०० स्क्वे.फूट मथुरानगर येथील ८००, २००० स्क्वे. फूट व गणेशनगर मधील १८०० स्क्वे. फूट चा प्लॉट तसेच होसिंग प्लॉट मधील रो-हाऊस व घोलपनगर मधील १४०० स्क्वे.फूट खुली जागा योग्य किंमतीत विकणे आहे

संपर्क : 9423237685



Since - 1985
YASH
BOMBAY DYEING
साडी सेल धमाका
नागपंचमीसाठी
खास नवीन् ट्रेंडच्या
साड्यांचा खजिना
• लक्ष्मीपती
• तक्षक्षीला
• लोटस पैठणी
• आरीवर्क पैठणी
• सुचीत्रा । केसरी नंदन
• इन्स्टा व्हायरल सिल्क साडी
• श्रावण स्पेशल पांढरी साडी
यश
कलेक्शन
मेनरोड, करमाळा
सारीज
जय महाराष्ट्र चौक, करमाळा
मेनरोड, करमाळा. मो.9150311008




वाढदिवस शुभेच्छा
करमाळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष
व यशस्वी युवा उद्योजक
26 जुलै
मा.श्री.
भरत (भाऊ) आवताडे
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
वैभव ट्रेडर्स
हार्डवेअर, मशनरी, प्लंबिंग, सिमेंट पाईप, सिमेंट बेंच, रेडिमेड शौचालय शोष खड्डा इ.मिळतील
पत्ता : परांडा रोड, शिवाजी चौक, अर्जुननगर फाटा, ता.करमाळा., जि.सोलापूर
प्रोप्रा : अशोक माने (९९२१७७३४३४)

आरोग्याचा प्रश्न हा औषधाबरोबरच आहारावर अवलंबून असतो..!

## संपादकीय.........................................!

# दूध की केमिकल ?

सध्या महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण देशभरात दुधाच्या तुटवड्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. दूध हे प्रत्येक कुटूंबाच्या दैनंदिन आहाराचा एक अविभाज्य भाग आहे. मात्र आजच्या घडीला आपण जे दूध घेतोय, ते खरेच नैसर्गिक दूध आहे का ? की ते रसायन अथवा भेसळयुक्त पाणी आहे ? या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. ही अशीच स्थिती राहिलीतर आपल्या आरोग्याचे काय ? हा प्रश्न अनुत्तरीत राहणार आहे.

भारतात दूध उत्पादनाची आकडेवारी सन २०२४ मध्ये देशात जवळपास २३९.३ मिलीयन टन दूध उत्पादन झाले. ही संख्या जरी मोठी वाटत असलीतरी दरवर्षी वाढणारी लोकसंख्या, शहरीकरण आणि खाण्याच्या सवयींमध्ये झालेला बदल या सर्व गोष्टींमुळे दूधाची गरज अधिक वाढलेली आहे. विशेषत: महाराष्ट्रात उन्हाळ्यात दूध उत्पादनात २०-२५ टक्के घट येते. दुसरीकडे सध्याच्या बाजारात मिळणाऱ्या दूधापैकी १० ते १५ टक्केच दूध गावरान गाईंकडून मिळते, उर्वरित दूध हे मोठ्या प्रमाणावर जर्सी किंवा होलस्टिन गाईंकडून किंवा त्याहून वाईट म्हणजे रासायनिक पध्दतीने तयार केलेले म्हणजेच भेसळयुक्त रसायनिक दूध असते.

FSSAI च्या अहवालानूसार भारतात तपासलेल्या दूध नमुन्यांपैकी काही मध्ये युरिया, डिटर्जंट, सॉडा, हायड्रोजन पेरॉक्साईड आढळले आहे. महाराष्ट्रातील एक स्वायत्त ग्राहक संस्थेच्या चाचणीत तर ६९% दूध भेसळयुक्त आढळले आहे ! याचा अर्थ असा की, आपण दररोज आपल्या कुटूंबाला 'पोषण' देतोय, की 'विष' देतोय.

आज बाजारात मिळणाऱ्या गोड पदार्थांपासून (मिठाई, पेढे, रबडी, बर्फी) ते पनीर व बासुंदी पर्यंत सर्व काही ए-वन दूध अथवा भेसळयुक्त दूधातून बनवलेले असते. अत्यंत दुर्मिळ ठिकाणीच ए-टू दूधाचा उपयोग होतो. गिरगाई, साहीवाल, थारपारकर, लालसिंधी यासारख्या भारतीय गाईंच्या दूधात 'ए-टू प्रोटीन' असते, जे शरीरासाठी पोषक असते, पचनास मदत करते व अनेक आजार टाळण्यासाठी उपयुक्त आहे. याउलट, ए-वन दूध हे परकीय गाईंपासून मिळते आणि त्यात बीटा कॅसोमोर्फिन-७ नावाचे प्रथिन तयार होते, जे शरीरात जळजळ, पचन बिघडवणे, मधुमेह व ह्दयरोग यासारख्या आजारांना कारणीभूत ठरते, असे संशोधनातून सिध्द झाले आहे. दूधाचा मुद्दा केवळ आरोग्याचा नाही, तर तो शेतकऱ्याच्या उपजिविकेचाही प्रश्न आहे. आज दूध उत्पादक शेतकऱ्याला फक्त ३०-३५ रूपये प्रतिलिटर दर मिळतो. काही भागात तर तो दर १७-१६ रूपये इतकाही कमी आहे. दुसरीकडे बाजारात पॅकेट बंद दूध ६०-७० रूपये दराने विकले जाते. ग्राहक जास्त पैसे देतो, पण शेतकऱ्याला त्याचा लाभ मिळत नाही. कारण दुधाच्या साखळीत मध्यस्थांची संख्या वाढली आहे.

या सगळ्यात महत्वाचा भाग असा की, दूध उत्पादनाचे इनपुट्स जसे की कडबा, गवत, खाद्यपदार्थ, औषधे, कामगार यांचे दर मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. गायींसाठी लागणारे खुराकाचे दर डबल झालेत, पण शेतकऱ्याच्या हातात येणारा दर मात्र वाढलेला नाही; ही अत्यंत अन्यायकारक स्थिती आहे.

दूध उत्पादनाचा खर्च प्रचंड वाढलेला आहे. एक गाईच्या संगोपनासाठी मासिक सरसरी ५ ते ७ हजार रूपये इतका खर्च येतो. यात गाईसाठी लागणारा खुराक- कडबा, गवत, पेंड, मकवान, पाणी, औषधे, गोठा देखभाल, वीज खर्च आणि मजुरी या सर्वांचा समावेश होतो. यामध्ये दररोज सुमारे सहा ते आठ लिटर दूध मिळतं. म्हणजे महिन्याला १८० ते २४० लिटर दूध. शेतकऱ्याला जर ३० रू. दर मिळाला तर उत्पन्न ५४०० रूपये ते १७२०० रूपये एवढं होते. पण खर्च जर ६००० रू. गेला तर मिळणारा नफा किरकोळच उरतो आणि तोही सर्व गाई नियमित दूध देत असतील तरच ! गायी आजारी पडल्या, चारा महागला, पाऊस नाही आला, मजुरांचा तुटवडा झाला तर शेतकऱ्याच्या हातात तोटाच उरतो, ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

दूध व्यवसाय परिपूर्ण करण्यासाठी काही उपाय केले पाहिजे. त्यामध्ये सर्वप्रथम सरकारने दूध भेसळ रोखण्यासाठी कडक नियमावली लागू करावी. स्थानिक स्तरावर दूध परीक्षण केंद्र सुरू करावीत आणि दूध उत्पादनांमध्ये ए-टू आणि ए-वन असा स्पष्ट फरक करून लेबलिंग सक्तीचे करावे. दुसरे म्हणजे गावरान गायीच्या संगोपनासाठी प्रोत्साहन योजना राबवाव्यात. त्यांचे अनुदान, विमा संरक्षण, गोठा निर्मिती सुलभ करावी. सगळ्यात महत्वाचे म्हणजे दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी किमान हमीभाव जाहीर करून त्यांच्या उत्पादन खर्चाची भरपाई करावी.

दूध हे पवित्र मानले जाते. शिवाला दुग्धाभिषेक करतो, बाळासाठी आईच्या दुधाइतके दुसरे पोषण नाही. पण जर आजच्या दुधातच विष मिसळले जात असेलतर मग आरोग्याच्या सर्वच संकल्पना धोक्यात येणार आहेत. म्हणूनच आज प्रत्येक सुज्ञ नागरीकाने आपल्या घरात वापरले जाणारे दूध नेमके कोठून येते, त्यात काय आहे याचा विचार करणे ही काळाची गरज आहे.

पान १ वरून पुढे...

## अखेर डिकसळ पुल वाहतुकीसाठी बंद - ३० गावांचा पुणे जिल्ह्याशी संपर्क तुटला







वाहतूक बंद केल्याने परिसरातील जवळपास ३० गावांचा पुणे जिल्ह्याशी असणारा संपर्क तुटलेला आहे. या निर्णयामुळे कोंढारचिंचोली, टाकळी, जिंती, केत्तूर नं.१ व २, वाशिंबे, गोयेगाव, कुंभारगाव, सावडी, दिवेगव्हाण, कात्रज, हिंगणी खातगाव, पोमलवाडी, गुलमरवाडी, भगतवाडी, घरतवाडी गावांचे दळणवळण ठप्प झाले आहे.

### नवीन पुलाचे काम संथगतीने

माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या काळात नवीन पुलासाठी ५५ कोटींचा निधी मंजूर झाला होता. कामही सुरू झाले, मात्र त्याची गती अत्यंत मंद असल्याने तोपर्यंत वाहतूक ठप्प राहणार असल्याचे संकेत आहेत. डिकसळ पुल बंद झाल्यामुळे ३० गावांचा संपर्क पूर्णत: तुटला असून तातडीने पर्यायी व्यवस्था न झाल्यास आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक अडचणी निर्माण होणार आहेत.

## आचार्य आनंदऋषीजी म.सा यांची जयंती साजरी

करमाळा(सं.प्र.): स्व.चंद्रकलाबाई हरिचंदजी लुणिया जैन स्थानक करमाळा येथे आचार्य आनंदऋषी म.सा. चे शिष्य म.सतीयाजी पुष्पकवरजी म.सा. आदिठाणा ६ यांचा चार्तुमास चालू असून यामध्ये आचार्य आनंदऋषी म.सा. यांची १२५ वी जयंती विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त सलग पाच दिवस तप, जप, उपासना, अंबिल, भजन, भाषण आदी कार्यक्रम झाले. यावेळी वाशिंबे येथील सोनाली ओस्तवाल हिने ११ उपवासाची सांगता केली. सरीता सोळंकी यांचे १३ उपवास चालू आहे. जन्म दिनी कचरूलाल मंडलेचा, अमोल बाबुलाजी हिरण सुचिता अभिजीत कटारिया यांनी तीन उपवास केले. १२५ श्रावक-श्राविकांनी एकासना (एकवेळ जेवण) उपवास केला. करमाळा येथे म.सा.६ चा चार्तुमास चालू आहे. जैन बंधूंनी दर्शनाचा लाभ घ्यावा; असे आवाहन चातुर्मास समिती व श्रावक संघाचे सचिव कचरूलाल मंडलेचा यांनी केले आहे.

## वर्गात जाताना बेशुध्द पडल्याने विद्यार्थ्याचा मृत्यू



करमाळा(सं.प्र.) : कंदर येथील रहिवाशी असलेला स्वप्नील मन्मथ शिंदे (वय-१६) या विद्यार्थ्याचा वर्गात जाताना बेशुध्द होऊन जागीच मृत्यू झाला आहे. हा प्रकार २४ जुलैला दुपारी सव्वातीनच्या सुमारास घडलेला आहे. स्वप्नील शिंदे हा रयत शिक्षण संस्थेच्या टेंभूर्णी येथील न्यु इंग्लीश स्कुल मधील दहावीच्या वर्गात शिकत होता. नेहमीप्रमाणे दुपारी २ वा. ५० मि. लहान सुट्टी होऊन ३ वा. १० मि. शाळा भरण्याची वेळ झाली. मुले वर्गात जात होती. स्वप्नील वर्गात जाताना पहिल्या मजल्यावरील जिन्यासमोर अचानक पडून बेशुध्द झाला. मुख्याध्यापकांनी स्वप्नीलला त्वरीत खासगी रूग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून स्वप्नील मृत झाल्याचे सांगितले. प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन केल्यानंतर स्वप्नीलचे प्रेत त्याच्या कुटूंबाच्या ताब्यात देण्यात आले. स्वप्नील हा मन्मथ शिंदे यांना एकुलता एक मुलगा होता. त्यांना लहान दोन मुली आहेत. स्वप्नीलचे आजोबा अर्जुन शिंदे हे कीर्तनकार असून स्वप्नील स्वत: पखवाज वादक होता.

फ्लॅट भाड्याने देणे आहे
बायपास रोड जवळील
2BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे
संपर्क : मो.9423237685



प्रियंका
आय केअर हॉस्पीटल



पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ञ ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

• कन्याकुमारी •
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्
दि.११/८/२०२५ ते १८/८/२०२५
सहल खर्च : १०,०००/-

• चारधाम यात्रा •
गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ बद्रीनाथ, हरिद्वार, ऋषीकेश
दि.७/१०/२०२५ ते १७/१०/२०२५
सहल खर्च : ३५,०००/- रेल्वे प्रवास 3-AC

• चारधाम दर्शन यात्रा •
यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ बद्रिनाथ, ऋषिकेश, हरिद्वार
दि.७/९/२०२५ ते २१/९/२०२५
सहल खर्च : ३५,०००/- रेल्वे प्रवास 3-AC

द्वारकाधाम
गिरनार पर्वत, जुनागड, पोरबंदर सोरटी सोमनाथ, नागेश्वर ज्योर्तिलिंग
दि.६/११/२०२५ ते १३/११/२०२५
सहल खर्च : ११,५००/-

• केरळ दर्शन •
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, कन्याकुमारी त्रिवेंद्रम, मदुराई, मुन्नार, रामेश्वरम्
दि.२३/१०/२०२५ ते ४/११/२०२५
सहल खर्च : ३३,०००/- रेल्वे प्रवास 3-AC

• नेपाळ दर्शन •
वाराणसी, गोरखपूर, पोखरा, लुंबिनी मनोकामना, काठमांडू, अयोध्या, प्रयागराज
दि.५/१२/२०२५ ते १८/१२/२०२५
सहल खर्च : २७,५००/- रेल्वे प्रवास 3-AC

• गंगासागर दर्शन •
गंगासागर, कलकत्ता, साक्षीगोपाल कोणार्क, भुवनेश्वर, जगन्नाथपुरी धाम
दि.१६/११/२०२५ ते २४/११/२०२५
सहल खर्च : १२,८००/-

रेल्वे प्रवास, बस प्रवास, भोजन व्यवस्था, राहण्याची उत्तम सोय

संपर्क : 8888333638 | 8698333638 | 7218333638



शिवरत्न ॲग्रो सर्व्हिसेस



प्रोप्रा : अमरजित साळुंके (मो.९८२३३७१४५७)

फिनोलेक्स ड्रिप, पीव्हीसी पाईप, एचडीपीई पाईप, स्प्रे पाईप, मोटर., सर्व प्रकारची खते, कीटकनाशक, तणनाशक, बी-बियाणे., एचटीपी स्प्रे पंप, बॅटरी पंप तसेच शेती उपयोगी सर्व साहित्याचे अधिकृत विक्रेते

• नवीन पत्ता •
बायपास चौक, उड्डाण पुलाजवळ, कमलादेवी रोड, करमाळा.


# श्री बनशंकरी मोबाईल शॉपीला विव्होचा बेस्ट सेलर अवार्ड



